लोकमत

# 'महावीर'-'नाईट'मध्ये आज अंतिम लढत

## आंतरविभागीय विद्यापीठ क्रिकेट : कागलमध्ये सामने

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत महावीर महाविद्यालयाने डॉ. दौलतराव अहिर अभियांत्रिकी महाविद्यालय (कऱ्हाड) संघावर ७० धावांनी पराभव करीत स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. आज, सोमवारी विजयी संघाची नाईट कॉलेज कोल्हापूर संघाबरोबर अंतिम फेरीत गाठ पडणार आहे.

कागल क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर झालेल्या उपांत्य फेरीत महावीर महाविद्यालयाने दौलत अहिर संघावर मात केली. प्रथम फलंदाजी करताना महावीरने ४० षटकांत २१२ धावा केल्या. यात साहिल शिंबे याने ९२, विश्वजित देवकांतने ३५, अनुप कुलकर्णी २५ यांनी धावसंख्येला आकार दिला. उत्तरादाखल खेळताना अहिर संघाचा डाव सर्वबाद १४० धावांत गुंडाळला. यात अहिरकडून शिवाजी खांबे याने ४०, प्रशिल पवारने २३ व हर्षल देशमुखने १५ धावा केल्या. महावीरकडून श्रेयस पाटीलने तीन, हृषिकेश चव्हाण, विश्वजित देवकांत, अजय चुयेकर यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

भेदक गोलंदाजीच्या जोरावर महावीर कॉलेज संघाने हा सामना जिंकत स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. आज, सोमवारी महावीर कॉलेजची गाठ नाईट कॉलेज संघाबरोबर पडणार आहे.

लोकमत

# जीवनमूल्यामुळे व्यक्तीला परिपूर्णता : महेश काकडे

## 'विवेकानंद'च्या राष्ट्रीय सेवा योजनेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून व्यक्तीला परिपूर्ण करणारी जीवनमूल्ये रुजविली जातात. यामधून व्यक्तीला परिपूर्णत: येते. म्हणून महाविद्यालयीन युवकांनी अशा शिबिरामध्ये हिरिरीने सहभाग घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वसगडे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

प्राचार्य होनगेकर म्हणाले, आज जगात दहशतवाद, सीमावाद यासारख्या समस्यांनी उग्र रूप धारण केले. या समस्यांना तोंड देण्याची ताकद राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते.

कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी स्वागत केले. यावेळी सरपंच नेमगोंडा पाटील, उपसरपंच संदीप कामत, रावसाहेब झोरे, जी. डी. गिरिगोसावी, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. बी. एम. लाड, प्रा. संदीप पाटील, प्रा. बी. के. गावीत, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी व एन.एस.एस. स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.